संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com

दैनिक
माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६
www.mandeshexpress.com




वर्ष : ६ वे ● ● अंक : ११६ ● ● गुरूवार दि. १४ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021

# अहमदनगरचे नाव आता 'पुण्यश्लोक अहिल्यादेवीनगर'

## आम. गोपीचंद पडळकरांच्या मागणीला यश : आटपाडीत पेढे वाटून आनंद साजरा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : अहमदनगर जिल्ह्याचे नामांतर पुण्यश्लोक अहिल्यादेवीनगर करावे अशी मागणी आमदार गोपीचंद पडळकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी सातत्याने पाठपुरावा देखील केला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात काल राज्याच्या मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत एकूण २६ निर्णय घेण्यात आले असून अहमदनगर शहराचे नावे बदलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे अहमदनगर शहराचे नाव ''पुण्यश्लोक अहिल्यादेवीनगर' करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतलेला आहे. या निणर्याचे स्वागत आमदार गोपीचंद पडळकर यांनी केले असून आटपाडी येथे पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला.



१) आंबेवाडी येथे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी' यांच्या पुतळ्याला अभिवादन करताना आम. गोपीचंद पडळकर २) उपस्थित नागरिकांना पेढे वाटून आनंद साजरा करताना आम. गोपीचंद पडळकर

मागील वर्षी चौंडी येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या कार्यक्रमात आमदार गोपीचंद पडळकर यांनी अहमदनगरचे नामांतर 'अहिल्यादेवीनगर' करण्याची मागणी कार्यक्रमास उपस्थित असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नामांतराची घोषणा केली होती.

मंत्रीमंडळ बैठकीत अहमदनगर जिल्ह्याचे नाव 'पुण्यश्लोक अहिल्यादेवीनगर' असे करण्यात आले असून तसा निर्णय झाला आहे. याबाबत आमदार गोपीचंद पडळकर यांनी आटपाडी येथे पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला. तर आंबेवाडी येथे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी' यांच्या पुतळ्याला अभिवादन करत या ठिकाणी गावकऱ्यांनी आमदार गोपीचंद पडळकर यांना पेढे भरविण्यात आले. यावेळी युवा नेते चंद्रकांत दौंडे, दादा मोटे, चंदू काळे, विनायक पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



करगणी येथील बाळेवाडी रस्त्याच्या दुतर्फा भरलेली जनावरांची यात्रा

# करगणीतील जनावरांच्या यात्रेत कोटींची उलाढाल

## १० हजारहून अधिक जनावरांची आवक : यात्रेची सांगता

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तालुक्यातील करगणी येथील ग्रामदैवत लखमेश्वराच्या यात्रेत खिलार जनावरांच्या यात्रेत कोटींची उलाढाल झाली असून, तब्बल पाच कोटी रुपयांच्या आसपास उलाढाल झाली असून यात्रेत जनावरांची मोठ्या संख्येने आवक झाल्याने खिलार जनावरांची खरेदी विक्री मोठया प्रमाणात झाली. काल (दि.१३) या यात्रेची सांगता झाली.

करगणी येथील श्रीरामाची यात्रा महाशिवरात्रीपासून उत्साहात सुरू झाली. पहिले तीन दिवस शेळ्या मेंढ्यांची यात्रा झाली. प्रसिद्ध खिलार जनावरांची यात्रा सोमवारपासून सुरू झाली. जातीवंत खिल्लार जनावरांसाठी ही यात्रा प्रसिद्ध आहे. मंगळवारी आणि बुधवारी ही यात्रा मोठी भरली होती. बाळेवाडी रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या माळावर पन्नास एकर क्षेत्रात खिलार जनावरांनी यात्रा झाली. बैलगाडीच्या शर्यती सुरू झाल्यापासून खिलार जनावरांच्या यात्रेला उलाढाल वाढली आहे.

खिलार खोंडांना ३० हजारापासून ते एक लाख - दोन लाखापर्यंत मागणी झाली. जातिवंत वळूच्या किमती लाखाहुन अधिक होत्या. यात्रेत ग्रामपंचायत आणि बाजार समिती मार्फत पाण्याची आणि दिवा बत्तीची सोय करण्यात आली होती. ग्रामपंचायत,बाजार समिती आणि यात्रा समितीने चोख नियोजन केल्याने यात्रेकरूंची चांगली सोय झाली.


करगणी येथील यात्रेला चांगला प्रतिसाद लाभला. यात्रेत १० हजारहून अधिक जनावरांची आवक आणि पाच कोटी रुपयांची उलाढाल झाली, असल्याची माहिती बाजात समितीचे सभापती पै. संतोष पुजारी यांनी दिली.

# हा ब्रह्मराक्षस आम्हीच तयार केला

## विजय शिवतारे:अजित पवारांवर केला हल्लाबोल



अजित पवार



विजय शिवतारे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

पुणे : एखाद्याचं चूक केली तर त्याला पश्चात्ताप तरी असतो. पण यांना तो पश्चात्तापही नाही. जणू काही लोकांना फसवणे हा जन्मजात अधिकार असल्यासारखे हे वागत आहेत. इथून मतदान घेऊन त्या जोरावर राज्यात, देशात ब्लॅकमेलिंग केलं जात आहे. हा ब्रह्मराक्षस आम्हीच तयार केला आहे. या पापाचं परिमार्जन आम्हा मतदारांनाच करावं लागेल. या रामायणातला रावणाच्या विरोधात लढणारा रामाच्या बरोबर असणारा बिभीषण विजय शिवतारे आहे, अशी टीका विजय शिवतारे यांनी अजित पवार यांच्यावर करत जोरदार हल्लाबोल करत, माजी मंत्री विजय शिवतारे यांनी पवार कुटुंबाविरुद्ध दंड थोपाटत, बारामतीमधून आपण निवडणूक लढवणार म्हणजे लढवणार, असा निर्धार केला आहे.

यावेळी बोलताना ते म्हणाले, ही निवडणूक 'नमो विचारमंच' या नावाखाली लढवणार आहे. प्रस्थापितांच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी ही लढाई मी लढतोय. मी महायुतीच्या विरोधात नाही. मी एकनाथ शिंदेंचा शिलेदार आहे. देवेंद्र फडणवीसांना गुरू मानणारा माणूस आहे. नरेंद्र मोदींशी निष्ठा असणारा मी माणूस आहे. मी बंडखोरी केलेली नाही. इथे पवार विरुद्ध पवार हाच सामना चालू आहे. विरोधातल्या ५ लाख ८० हजार मतदारांनी जायचं कुठे? असा प्रश्न विजय शिवतारे यांनी उपस्थित केला.

२०१९ च्या निवडणुकीत मी अजित पवारांच्या मुलाच्या विरुद्ध केलेला प्रचार राजकारणाचा भाग आणि माझं कर्तव्य म्हणून केला होता. पण अजित पवारांनी सभ्यतेची नीच पातळी गाठली. मी तेव्हा आजारी होतो. त्यामुळे ॲम्ब्युलन्समध्ये माझा पूर्ण प्रचार झाला. पण अजित पवारांनी तेव्हा म्हटलं की मरायला लागला आहात तर कशाला निवडणूक लढवताय? माझी गाडी कुणाची आहे, कुठल्या कंपनीची आहे वगैरे चौकशी करेपर्यंत अजित पवार खालच्या स्तरावर उतरले. तू कसा निवडून येतो तेच मी बघतो, महाराष्ट्रभरात मी कुणाला पाडायचं ठरवलं तर मी कुणाच्या बापाचं ऐकत नाही, पाडतो म्हणजे पाडतो असं ते म्हणाले, अशा शब्दातं विजय शिवतारे यांनी टीका केली.

गाव पेटवायला एक नालायक माणूस लागतो, काडी ओढायला. पण गाव वसवण्यासाठी अनेक हात लागतात. अजित पवारांनी उर्मट भाषा केली होती. पण मी त्यांना माफ केलं आहे. ते महायुतीत आले तेव्हा मी त्यांना जाऊन भेटलो. पण तरीही त्यांची गुर्मी तशीच होती. त्यांच्या उर्मटपणावर बारामती मतदारसंघात लोक म्हणाले की अजित पवार उर्मट आहे. त्यामुळे त्यांना आम्ही मत देणार नाही अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली असल्याने महायुती मध्ये यामुळे मोठी फुट पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# खोटा धनादेश प्रकरणी आटपाडीतील एकास शिक्षा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

आटपाडी/प्रतिनिधी खोटा धनादेश देवून फसवणूक केल्याप्रकरणी आटपाडी न्यायालयातील न्यायाधीश मा. विनायक पाटील यांनी आरोपीला सहा महिने तुरुंगवास व ४८८७६८ रुपये दंडाच्या रक्कमेची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी, आटपाडी येथील अंकुश भगवान जाधव यांनी रविंद्र दगडु सागर रा. सागरमळा नं १, आटपाडी यांचेविरुध्द कलम १३८ अन्वये आटपाडी न्यायालयात केस दाखल केलेली होती. सदर आरोपी रविंद्र दगडु सागर यांनी फिर्यादी अंकुश भगवान जाधव यांचेमार्फत दि बाबासाहेब देशमुख सह. बँकेतून कर्ज काढुन दिले होते. सदर कर्जाचे हप्ते आरोपी रविंद्र सागर हा भरणार होता. त्यांच्या परतफेडीपोठी त्याने चेक व नोटरी लिहुन दिली होती.

सदर बँकेचे कर्ज थकीत गेलेवर बँकेच्या हप्त्याची रक्कीम फिर्यादी अंकुश जाधव यांनी भरली. आरोपीने सदरची रक्कीम दिली नाही म्हणुन फिर्यादी अंकुश जाधव यांनी ॲड. चेतन व्ही. जाधव व ॲड. केदारनाथ भिंगे यांचेमार्फत केस दाखल केलेली होती.

मे. कोर्टानी फिर्यादी व आरोपी यांचे सर्व पुरावे पाहून यातील आरोपी रविंद्र दगडु सागर याला सहा महिने तुरुंगवासाची व मुळ रक्कम रु. ३,९०,०००/- व त्यावरील व्याज रक्क म रु. ९८७६८/- दंडाची शिक्षा सुनावली. सदरची रक्कचम न भरलेस पुन्हा एक महिन्याची साधी कैद तसेच रक्करम रू. १२.०००/- खर्चाची रक्क म देणचा आदेश पारीत केला. खर्चाची रक्कनम दिली नाही तर पुन्हा पंधरा दिवस साध्या कैदेचा आदेश दिला. फिर्यादीतर्फे ॲड. चेतन व्ही. जाधव व ॲड. केदारनाथ भिंगे यांनी काम पाहिले.

# सांगली लोकसभा शिवसेनाच लढणार : चंद्रहार पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : डबल महाराष्ट्र केसरी पैलवान चंद्रहार पाटलांच्या पक्षप्रवेशाच्या पार्श्वभूमीवर सांगली जिल्हा ठाकरे गट शिवसेना पदाधिकाऱ्यांचा मेळावा सांगलीवाडीत पार पडला. यामध्ये सर्वच पदाधिकाऱ्यांनी आणि नेत्यांनी सांगली लोकसभा निवडणूक लढवण्याची आक्रमक भूमिका जाहीर केली. शिवसेनेचे उपनेते नितीन बानुगडे पाटील आणि पैलवान चंद्रहार पाटील यांच्या उपस्थितीमध्ये हा मेळावा पार पडला.



पै. चंद्रहार पाटील

यावेळी बोलताना चंद्रहार पाटील म्हणाले, लोकसभा उमेदवारीबाबत शब्द दिला आहे. याचा साक्षीदार मातोश्री असून कोणत्याही परिस्थितीत सांगलीची लोकसभा निवडणूक आपण लढवणारच आणि ती जिंकणार. चंद्रहार पाटलांबरोबर लढताना विचाराने लढा, दुसऱ्या कोणत्याही भानगडीत पडू नका, आपण कुठेच तुम्हाला अडवणार नाही आणि कमी पण पडणार नाही, असा इशारा दिला. सांगली लोकसभा लढवणार आणि जिंकणार. सातत्याने काहीतरी करण्याचा प्रयत्न करत होतो. काहींनी विचारलं बैलगाडी स्पर्धा भरून मते मिळतात का? पण मी काहीतरी करू शकतो. मात्र, निष्क्रिय नाही. गेल्या दोन वर्षापासून मी नुसताच फिरत होतो. मात्र माझ्या फिरण्याला शिवसेनेनं आधार दिला. तो मी कधीच विसरणार नाही.

ते पुढे म्हणाले की, मला आदेश असल्याने फारसं बोलता येणार नाही. मात्र, मी फार काळ शांत राहू शकत नाही. कारण आता पैलवान आणि शिवसेना एकत्र आले आहेत. त्यामुळे चंद्रहार पाटलाशी लढताना विचार करून लढा, असे आव्हान त्यांनी दिले. आपल्यावर विश्वास टाकला तो विश्वास पात्र ठरवण्याचा आपण प्रयत्न करणार असून सांगली लोकसभेची जागा शंभर टक्के जिंकणार असल्याचे ते म्हणाले.

चंद्रहार पाटील यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करत मातोश्रीवर जाऊन शिवसेना ठाकरे गटामध्ये प्रवेश केला होता. यावेळी उद्धव ठाकरे यांनी सुद्धा चंद्रावर पाटील यांचे जोरदार स्वागत करताना हा मर्द दिल्लीला पाठवायचा असल्याची घोषणा केली होती. त्यामुळे सांगली लोकसभेसाठी चंद्रहार पाटील मैदानात असणार का? याची चर्चा रंगली आहे. चंद्रहार पाटील यांनी सुद्धा सांगली लोकसभा शिवसेनेची असल्याचे म्हटले आहे.

# जागतिक कर्णबधिरता नियंत्रण सप्ताह साजरा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : दरवर्षी ३ मार्च हा दिवस जागतिक कर्णबधिरता दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमाचे सन २०२४ चे घोषवाक्य changing mind set : lets make ear and hearing care a reality of all असे आहे. जागतिक कर्णबधिरता दिनानिमित्त २ मार्च ते ९ मार्च या कालावधीत कर्णबधिरता सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहाचे उद्घाटन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम यांच्या हस्ते करण्यात आले. या सप्ताहामध्ये ६ मार्च रोजी वैद्यकीय अधिक्षक उपजिल्हा रूग्णालय व ग्रामीण रूग्णालय, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, सामुदाय आरोग्य अधिकारी, उपकेंद्र व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्याकरीता आवाजाचे दुष्परिणाम, कर्णबधिरतेचे धोके, लक्षणे, उद्धवणाऱ्या विविध समस्या व त्यावरील उपाययोजना, कानाची काळजी, इत्यादीबद्दल शिपीळींळूरींळेप वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते. या वेबिनारसाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विभीषण सारंगकर, उपजिल्हा रूग्णालय शिराळा चे कान, नाक, घसा तज्ज्ञ डॉ. अनिरूध्द काकडे यांनी मार्गदर्शन केले.

# फॅबटेक फार्मसी मध्ये जागतिक महिला दिन साजरा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगोला : येथील फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये जागतिक महिला दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी आठ मार्च जागतिक महिला दिवस म्हणून साजरा केला जातो.

या कार्यक्रमासाठी सांगोला तालुक्यातील इनर व्हील क्लब सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष सविता लाटणे व पोलीस हेडकॉन्स्टेबल शबनम शेख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गुन्हेगारीपासून स्वतःचे रक्षण कसे करायचे तसेच निर्भया पथक याबद्दल माहिती दिली. तसेच स्त्री पुरुष समानता स्त्री शिक्षण ही एक काळाची गरज आहे यावर देखील मार्गदर्शन केले. शबनम शेख यांनी कायद्याविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी बाबर व साक्षी क्षीरसागर यांनी केले, प्रमुख पाहुणे यांचा परिचय प्राचार्य डॉ. संजय बैस यांनी केला तर आभार प्रदर्शन प्रा.अश्विनी भिंगे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# आटपाडीचे विनायक मासाळ यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थित प्रवेश : पक्षाकडून थेट प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तालुक्याचे युवा नेते विनायक मासाळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थित त्यांनी पक्षप्रवेश केला. पक्ष प्रवेश करताच थेट त्यांची पक्षाच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

आटपाडी तालुक्यातील मासाळवाडी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये त्यांच्या पॅनेलची एक हाती सत्ता आली होती. सांगली जिल्ह्याचे विद्यमान खासदार संजयकाका पाटील यांचे ते समर्थक म्हणून ते आटपाडी तालुक्यात ओळखले जात होते. त्यांनी अनेक सामाजिक कामा बरोबरच धार्मिक कामात सुद्धा त्यांचे मोठे योगदान असायचे. त्यांनी मासाळवाडी गावातील अनेक भाविकांना स्वःखर्चाने तिरुपती बालाजी येथे घेवून जात त्यांना दर्शन घडविले होते.

नुकत्याच मासाळवाडी ग्रामपंचायतिच्या झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये त्यांनी एक हाती सत्ता काबीज केली होती. राजकारण करत असताना त्यांनी समाजकारण देखील जपले. आटपाडीच्या शेळी-मेंढी यात्रेमध्ये त्यांनी संपूर्ण यात्रेला मोफत जेवण देत दानशूरपणा दाखवून दिला.

आटपाडी तालुक्यात राजकारण करत असताना ते अलिप्त होते. परंतु राज्यातील बदल्यात सत्ता समीकरणामुळे त्यांनी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये मंत्री इंदापूरचे आम. दत्तामामा भरणे यांच्या मध्यस्थीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थित मुंबई येथे पक्ष प्रवेश केला.

यावेळी भिंगेवाडीचे लोकनियुक्त सरपंच बाळासाहेब हजारे, मासाळवाडीचे माजी सरपंच लक्ष्मण तळे, गारळेवाडीचे सरपंच सागर गारळे,दिलीप देवकाते, सुधीर गारळे, नगरसेवक अमोल भडांगे, अंकुश भोसले (महाराज) पोपट चव्हाण, जे.जे. जानकर, राजू अर्जुन, डॉ. रवी नाळे, अक्षय अर्जुन, आदिनाथ कचरे, काका खांडेकर, अमोल काटकर, साहेबराव अर्जुन, विकास मासाळ आदी मान्यवर उपस्थित होते.



राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर विनायक मासाळ यांना नियुक्तीचे पत्र देताना उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, यावेळी उपस्थित आम. दत्तामामा भरणे, बाळासाहेब हजारे व उपस्थित मान्यवर

*** संपादकीय ***

# फाळणीच्या भुतांचा नाच

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटली तरीही भारतीय नागरिक कोण आहेत, कोण असू शकतात आणि कोणाला भारतीय नागरिकत्व देता येते; हे वादाचे विषय व्हावेत, यासारखे दुर्दैव नाही. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटना लागू झाल्यानंतर सन १९५५ मध्ये जो नागरिकत्व कायदा मंजूर झाला होता; त्यातील एक कलम फार महत्त्वाचे होते. ते म्हणते, 'जर एखादी व्यक्ती किंवा तिच्या मातापित्यांपैकी एक, किंवा आजी-आजोबा यांच्यापैकी कोणीही एक फाळणीपूर्व भारतात जन्मलेली असेल तर ती व्यक्ती मूळ भारतीय आहे, असे मानले जाईल...' हे कलम भारतीय राज्यघटनेच्या धर्मभेद न मानणाऱ्या मूलभूत रचनेशी सुसंगतच होते. पुढे आसाममधील घुसखोरीचा जो प्रश्न निर्माण झाला; त्याने या कलमाच्या आदर्श औदार्याच्या सीमा दाखवून दिल्या. आता केंद्र सरकारने ज्या नव्या नागरिकत्व सुधारणा कायद्याची अधिसूचना काढली आहे; तिचा मुहूर्त राजकीय आहे, हे वेगळे सांगायला नको. त्याचे ताबडतोब राजकारण सुरू झाले आहे. मात्र, हा कायदा भारतात आज राहणाऱ्या कोणत्याही धर्माच्या नागरिकांच्या विरोधातला नाही, हे आवर्जून लक्षात ठेवायला हवे. एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवैसी हे त्यांच्या वर्तनप्रथेप्रमाणे दिशाभूल करणारी, तर्कदुष्ट विधाने करीत आहेत. हे हवा तापविण्याचे षडयंत्र चालू देता कामा नये. दुसरीकडे, या कायद्याचे निमित्त करून मुस्लिमविरोधी गरळ ओकणाऱ्या सर्वांची तोंडे बंद करायला हवीत. सरकारने केलेल्या कायद्यात काय त्रुटी आहेत; याचे स्पष्ट दिग्दर्शन काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी केले आहे. त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

नव्या कायद्याप्रमाणे ३१ डिसेंबर २०१४च्या आधी पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या तीन देशांमधून आलेल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिस्ती या सहा धर्मांच्या नागरिकांना भारतीय नागरिकत्व देण्यात येणार आहे. यात केवळ मुस्लिमांचा समावेश नाही. मात्र, ज्या धार्मिक कारणामुळे अखंड भारताची फाळणी झाली; त्या पाकिस्तान व बांगलादेशातील (तसेच, अफगाणिस्तानातील) अल्पसंख्य समाजांची आजची अवस्था काय आहे; याकडेही पाहायला हवे. सन १९४७ ते १९७१ 'अखंड पाकिस्तान' होता. फाळणी झाली तेव्हा या पाकिस्तानात जवळपास २४ टक्के हिंदू होते. एकट्या लाहोर शहरात बेबंद कत्तली होऊनही अडीच लाख हिंदू व शीख उरले होते. आज (पश्चिम) पाकिस्तानात अडीच-तीन टक्के तरी हिंदू उरले आहेत का? भारत हे कोण्या एका धर्माचे राष्ट्र नाही. म्हणूनच भारतात सन १९४७पासून सर्व धर्मांच्या नागरिकांची लोकसंख्या जवळपास सम प्रमाणात वाढली आहे. मग पाकिस्तानातले इतके हिंदू कुठे गेले? मरण पावले की धर्मांतरित झाले? या प्रश्नाचे उत्तर कोणी द्यायचे? तीच गोष्ट अफगाणिस्तानची. तेथे एकेकाळी हजारो शीख होते. आज त्यातील फक्त दीड-दोनशे शीख उरले आहेत. या कायद्यात ख्रिस्ती समाजाचाही समावेश आहे. वरील तीनही देशांमध्ये जीवन मुश्कील होणाऱ्या सर्वांना आश्रय देणे, हे भारताचे एका परीने कर्तव्यच आहे. ती आपली भावंडे आहेत.

मग या कायद्यातली चूक काय आहे? पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेश या देशांमधून भारतात आश्रय घेतलेल्या मुस्लिमांनाही नागरिकत्व देण्याची भूमिका या कायद्याने घ्यायला हवी होती. भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीशी ते सुसंगत ठरले असते. पाकिस्तान हे मुस्लिम राष्ट्र असल्याने तेथे मुस्लिमांचा छळ होत नाही, हा एक गैरसमज आहे. पाकिस्तानच्या घटनेत सुधारणा करून 'अहमदिया' हे मुस्लिम नाहीत, असे नमूद केले आहे. या अहमदियांचीही पितृभू एकेकाळचा अखंड भारत हीच आहे. मग त्यांना स्वीकारायचे, की नाही? पाकव्याप्त काश्मीर, बलुचिस्तान येथील असंख्य मुस्लिमांचा अतोनात छळ होतो. त्यांनाही उद्या भारत हेच आश्रयस्थान असू शकते. भारताला असा नागरिकत्व कायदा करावा लागतो; यात या शेजारी देशांचे केवढे घोर अपयश आहे आणि त्यांची धर्मांधता कशी मूळ भारतीयांच्या मुळावर येते आहे; यावर तर या कायद्याला विरोध करणारे कोणी काही बोलायलाच तयार नाहीत. भारतात कोणत्याही समस्येकडे निष्पक्ष, वस्तुनिष्ठ आणि पूर्वग्रहविरहीत दृष्टीने पाहण्याची क्षमताच सारे गमावून बसले आहेत. यातून देशाचे अनेक पिढ्या नुकसान होत आले. आजही होते आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी या कायद्याचे समर्थन करताना इतके आक्रमक होण्याची काहीही आवश्यकता नव्हती. हे आपण हिंदूहिताचे पाऊल टाकले आहे; असे मोदी सरकारच्या समर्थकांना अधोरेखित करायचे आहे. प्रत्यक्षात हा भारतीय उपखंडात धार्मिक द्वेषाला बळी पडणाऱ्या सर्वांना प्रेमाने जवळ करणारा मानवी मूल्यांचा कायदा आहे; असे चित्र उभे राहायला हवे होते. भारतात ३१ डिसेंबर, २०१४ च्या आधी शेजारी देशांतून जी मुस्लिम कुटुंबे छळामुळे भारतात आश्रयाला आली असतील; त्यांना नव्या कायद्याने अनाथ करून टाकले आहे. विसाव्या शतकातील शोकांतिकांपैकी भारताची फाळणी ही एक होती. सीएएचा वादंग हा या फाळणीच्या भुतांचाच नवा नाच आहे. त्याने भारतातील सौहार्दाला नख लागू नये.

# कर्जाच्या खांद्यावर प्रकल्पांचे ओझे

'महामुंबई' हा प्रदेश नावाप्रमाणेच 'महा' आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर व रायगड या पाच जिल्ह्यांचे पूर्ण वा काही भाग. बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, भिवंडी-निजामपूर, मिरा-भाईंदर, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर व पनवेल, या नऊ महापालिका. बदलापूर-कुळगाव, अंबरनाथ, कर्जत या तीन नगर परिषदा... असा हा व्यापक पसारा आहे. या क्षेत्रातील तब्बल ६४०० चौरस किलोमीटर जमिनीवरील विकासकामांची जबाबदारी एमएमआरडीएवर आहे. त्यामध्ये आजघडीला सात मेट्रो मार्गिकांची उभारणी, दोन मार्गिकांचे संचालन व तीन मार्गिकांचे नियोजन एमएमआरडीए करीत आहे. त्याखेरीज सागरी सेतू, उड्डाणपूल, उन्नत मार्गिका, भूमिगत वाहतूक मार्ग, धरण, विविध रस्त्यांची विकासकामेदेखील एमएमआरडीए करीत असून या सर्वांचा आगामी आर्थिक वर्षातील (२०२४-२५) अंदाजित खर्च हा ४१ हजार ९५५.३४ कोटी रुपये इतका असेल, असे नुकत्याच मांडलेल्या एमएमआरडीएच्या अर्थसंकल्पात निश्चित करण्यात आला आहे.

इतक्या विस्तीर्ण प्रदेशाचा विकास करताना त्यासाठीचा खर्च ४१ हजार कोटी रुपयांहून अधिक असणे अपेक्षित आहेच; मात्र तो भागविण्यासाठी मिळकतदेखील तितकीच असणे आवश्यक आहे. मात्र, आगामी आर्थिक वर्षात प्राधिकरणाला मिळणारा महसूल ३९ हजार ४५३ कोटी रुपये इतकाच असल्याचे अर्थसंकल्पातून दिसून येत आहे. या ३९ हजार ४५३ कोटी रुपयांमध्येही तब्बल ७१ टक्के, म्हणजेच २७ हजार ८६५ कोटी रुपयांची मिळकत ही कर्जाऊ रकमेतील आहे. त्याचा व्याजदरदेखील ७.५९ टक्के इतका आहे.

एमएमआरडीएने ऑक्टोबर २०२२ मध्ये केंद्र सरकारी आरईसी लिमिटेड या कंपनीकडून ३० हजार ५९३ कोटी रुपये कर्ज मिळण्यासाठी सामंजस्य करार केला होता. ते कर्ज ७.५९ टक्के व्याजदराने प्राधिकरणाला मिळणार होते. आता आगामी आर्थिक वर्षात मिळणारी २७ हजार ८६५ कोटी रुपयांची कर्जाऊ रक्कम हा त्याच ३० हजार ५९३ कोटी रुपये कर्जाचा भाग आहे. त्यामुळेच वार्षिक ४१ हजार ९५५ कोटी रुपये पायाभूत सुविधा खर्चासह ४६ हजार ९२१ कोटी रुपये खर्च एमएमआरडीएने आगामी आर्थिक वर्षात अपेक्षित धरला असताना, त्यातील २७ हजार ८६५ कोटी रुपये खर्चापोटी तब्बल दोन हजार ११५ कोटी रुपयांचे व्याज भरले जाणार आहे.

दरम्यान, राज्य सरकारने मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासासाठी व एकंदर प्रकल्पांचा आवाका पाहता आणखी ६० हजार कोटी रुपये कर्ज उभारणीसाठी प्राधिकरणाला मंजुरी याआधीच दिलेली आहे. आरईसी लिमिटेडचे कर्ज हा त्याचाच भाग आहे. दुसरीकडे केंद्र सरकारच्याच मे. पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेडनेदेखील प्राधिकरणाला तब्बल ५० हजार ३०१ कोटी रुपये इतके कर्ज विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी मंजूर केले आहे. या कर्जावरील व्याजदर तर १०



टक्क्यांहून अधिक आहे. याचाच अर्थ येत्या काळात आणखी पायाभूत सुविधा उभारणीची कामे एमएमआरडीए हाती घेणार आहे. मात्र त्यासाठीचा खर्च हा कर्जाऊ रक्कमेतूनच भागवला जाईल.

उद्योगांना किंवा व्यावसायिक कारणासाठी भूखंडांची विक्री (दीर्घकाळ भाडेपट्टीवर) करून त्याद्वारे मिळणारी रक्कम हाच एमएमआरडीएसारख्या विकास प्राधिकरणाचा महसुलाचा मुख्य स्रोत असतो. एमएमआरडीएने सुमारे २०-२२ वर्षांपूर्वी वांद्रे कुर्ला संकुल (बीकेसी) उभे करुन त्यातील भूखंड विक्रीद्वारे मोठा महसूल उभा केला होता. असाच महसूल वडाळा ट्रक टर्मिनल येथील भूखंड विक्रीद्वारेदेखील मिळाला होता. मात्र या दोन्ही ठिकाणच्या भूखंडांची उपलब्धता संपुष्टात येत आहे. बीकेसीतील उरलेल्या भूखंडांची विक्री करून प्राधिकरणाने अलीकडे तीन हजार कोटी रुपयांचा महसूल उभा केला; परंतु आता एकही भूखंड तेथे विक्रीसाठी उपलब्ध नाही. त्याचवेळी चालू आर्थिक वर्षातील ४१ हजार ९५५ कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधांसह येत्या काळात एकूण १.१९ लाख कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या पायाभूत सुविधांच्या विकामकामांचा डोलारा एमएमआरडीएला उभा करायचा आहे. मात्र तो सर्व खर्च केवळ कर्जाऊ रकमेतून उभा करावा लागेल, असे चित्र दिसत आहे.

'एमयूआयपी'मधील नियमांची अडचणदेखील एमएमआरडीएच्या वाढीव खर्चासाठी कारणीभूत ठरत आहे. कुठल्याही विकास प्रकल्पांमधील भूसंपादनापोटी येणारा खर्च याआधी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य सरकार उचलत होता. मात्र एमएमआरडीएचे विकास प्रकल्प हे मुंबई शहरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयूआयपी) या योजनेचा भाग आहेत. त्याअंतर्गतच या प्रकल्पांना केंद्र सरकारकडून वित्त सहाय्य तसेच निधी उपलब्ध होत असतो. 'एमयूआयपी'अंतर्गत हा निधी हवा असल्यास भूसंपादनाचा खर्च, खासगी जमीन संपादनापोटी येणारा मोबदल्याचा खर्च, हा संबंधित विकास प्राधिकरणालाच करावा लागतो. त्यामुळेच मेट्रोच्या कारशेडसाठी खासगी जमीनमालकांना द्यावा लागणारा मोबदला, वरळी शिवडी कनेक्टरमधील रहिवाशांच्या पुनर्वसनाचा ३५०० कोटी रुपयांचा खर्च असे विविध खर्च एमएमआरडीएला करावे लागत आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर महसुलाचे आणखी मार्ग खुले व्हावेत, यासाठीच नव्या व्यावसायिक संकुलाचा प्रस्ताव प्राधिकरणाने तयार केलेला आहे. मालाड भागातील मार्वेच्या समुद्रकिनारी बहुतांश अशा मोकळ्या सरकारी जमिनीवर हे व्यावसायिक संकुल बीकेसीच्या धर्तीवर उभारले जाईल. बीकेसीच्या धर्तीवरील हे नवे व्यावसायिक केंद्र मार्वेसह मालवणी, अक्सा, दारवली, एरंगळ व मढ या गावांमध्ये उभे करण्याचे नियोजन आहे. या गावांमधील एक हजार ३८७ हेक्टर म्हणजेच तीन हजार ४२७ एकर जमिनीचा त्यात समावेश आहे. यातील काही जमीन ही मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील 'विशेष नियोजन' श्रेणीतील; तर काही जमीन ही राज्य सरकारची आहे. अशा या एकत्रित जमिनीचा विकास करण्यासाठी एमएमआरडीएला 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून नियुक्त करण्याचा प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव मंजूर झाल्यास पुढील पाच ते दहा वर्षांत हजारो कोटी रुपयांचा महसूल एमएमआरडीएला मिळू शकतो.

खर्च सातत्याने वाढता असताना एमएमआरडीएला त्या तुलनेत महसूल मिळणारे मार्ग खुंटले आहेत, किंवा ते अत्यल्प आहेत. राज्य रस्ते विकास महामंडळाचे खर्चदेखील अशाचप्रकारे खूप अधिक आहेत. मात्र बांधलेल्या रस्त्यांच्या पथकर वसुलीद्वारे त्यांचा महसुलाचा स्रोत निश्चित आहे. महापालिकेचा विचार केल्यास, तेदेखील ५० हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मांडत असताना त्याचा खर्च मालमत्ता कर व जीएसटीच्या माध्यमातून वसूल होतो. एमएमआरडीएकडे मात्र सद्यस्थितीत ठोस महसूलप्राप्तीसाठी 'अटल सेतू' हा एकमेव मार्ग आहे. 'विकास नियोजन प्राधिकरण' या नात्याने पायाभूत सुविधांच्या उभारणीचे काम तर एमएमआरडीएला करायचे आहेच; मात्र त्यासह मेट्रो रेल्वे परिचालनाची जबाबदारीदेखील त्यांच्यावर आली आहे. यामुळेच दोन मेट्रो मार्गिकांचा वार्षिक २८१ कोटी रुपये, व मोनोरेलचा २४२ कोटी रुपये तोटादेखील एमएमआरडीएलाच सहन करावा लागत आहे. या स्थितीत एमएमआरडीएने नेमके काय करायचे? पायाभूत सुविधांची उभारणी करायची, की त्याचे परिचालनदेखील करायचे, हे निश्चित करावे लागेल. महामुंबईच्या विकासाची जबाबदारी असताना अनेक ठिकाणी 'सिडको' हे देखील नियोजन प्राधिकरण असल्याने विकास शुल्काचा महसूल हा त्यांच्याकडे जातो. त्यामुळेच पायाभूत सुविधांची उभारणी करताना महसूल मिळकतीची साधने मर्यादित असल्यास एमएमआरडीएच्या कामाचे दीर्घकालीन नियोजन आवश्यक आहे. तसेच, खर्चात कर्जाऊ रकमेचा वाटा व मिळणारा ठोस महसूल, याचे काटेकोर नियोजन अत्यावश्यक असेल. अन्यथा हजारो कोटी रुपयांच्या विकासकामांचा डोलारा कर्जावर राहील, अशी एमएमआरडीएची स्थिती आहे.

# महाराष्ट्र क्रांती सेना पक्ष चार जागा लढविणार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूरः महाराष्ट्र क्रांती सेना पक्षाने आगामी लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती पक्षाचे संस्थापक सुरेशदादा पाटील यांनी दिली. महाराष्ट्र क्रांती सेना पक्षाच्या वतीने रायगड, जळगाव, सिंधुदुर्ग-रत्नागिरी आणि हातकणंगले लोकसभा या चार जागा लढविण्यात येणार आहेत. बुधवारी (१३ मार्च) रोजी मुंबईत होणार्या राज्य कार्यकारणीच्या बैठकीत उमेदवारांची घोषणा केली जाणार आहे.

सुरेश पाटील यांनी सांगितले की, राजकारणात सातत्याने होत असलेली स्थित्यंतरे आणि राजकीय अराजकता यामुळे मागील काही वर्षांपासून महाराष्ट्रातील राजकारण ढवळून निघालेले आहे. प्रत्येक मतदारसंघात विद्यमान लोकप्रतिनिधींनी केलेली कामे याची माहिती घेऊन निर्माण झालेली राजकीय परिस्थिती पाहता महाराष्ट्र क्रांती सेना पक्षाने लोकसभा निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या महाराष्ट्राचे चित्र अत्यंत विदारक झाल्याचे दिसत आहे. जर महाराष्ट्रात खर्या अर्थाने क्रांती करायची असेल तर नव्या दमाच्या लोकांना संधी दिली गेली पाहिजे. तरच महाराष्ट्रात खर्या अर्थाने शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्षेत्राचा विकास होईल. हाच विकासाचा मुद्दा घेऊन महाराष्ट्राला विकासाच्या उंचीवर नेण्यासाठी नवीन कार्यकर्त्यांना लोकसभा निवडणूकीत संधी दिली जाणार आहे.

रत्नागिरी-सिंधुदुर्ग, हातकणंगले, जळगाव आणि रायगड या चारही लोकसभा मतदारसंघांमध्ये महाराष्ट्र क्रांती सेनेला अत्यंत चांगला प्रतिसाद असून महाराष्ट्र क्रांती सेनेची ताकत ही निर्णायक ठरणारी आहे. या चारही मतदारसंघात पाणी, नोकरी, शिक्षण आणि आरोग्य हे महत्वाचे प्रश्न सातत्याने भेडसावत आहे. ते प्रश्न सुटणे गरजेचे असताना मागील अनेक वर्षापासून ते प्रलंबितच आहेत. हे प्रश्न सोडवून मतदारसंघांचा विकासाच्या माध्यमातून कायापालट करण्यासाठी महाराष्ट्र क्रांती सेना पक्ष निवडणूक रिंगणात उतरत असल्याचे सुरेशदादा पाटील यांनी सांगितले. या संदर्भात बुधवार १३ मार्च रोजी मुंबई येथे महाराष्ट्र क्रांती सेना पक्षाची राज्य कार्यकारणीची बैठक होत आहे. या बैठकीत याची अधिकृत घोषणा आणि उमेदवारांची नावे जाहीर केली जाणार आहेत, अशी माहिती सुरेशदादा पाटील यांनी दिली.

# एकनाथ खडसे बॅकफूटवर; 'रावेर' लोकसभेवर काँग्रेसचा दावा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

जळगावः रावेर मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढविणारच म्हणणारे शरद पवार गटाचे नेते आमदार एकनाथ खडसे आता प्रकृतीचे कारण देत बॅकफूटवर गेले आहेत. खडसेंच्या या तळ्यात-मळ्यात भूमिकेच्या फायदा घेत महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्षाने आता रावेर मतदारसंघावर दावा केला आहे. दुसरीकडे खडसेंनी शरद पवार गटातील चार इच्छुकांची नावे जाहीर केल्याने पक्षात अंतर्गत धुसफुस देखील वाढली आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार आणि जयंत पाटील यांनी जिल्हाध्यक्ष ॲड. रविंद्र पाटील यांना तातडीने नाशिक येथे बोलावून घेतले आहे.

आघाडीच्या जागावाटपात २०१९ मध्ये रावेर लोकसभा मतदारसंघाची जागा काँग्रेसच्या वाट्याला गेली होती. मात्र, यंदा सुरुवातीपासूनच आमदार एकनाथ खडसे यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून लोकसभेची निवडणूक लढविण्याची इच्छा दाखवत स्वतःची उमेदवारी देखील जाहीर केली होती. त्यामुळे मविआच्या जागावाटपात राष्ट्रवादी शरद पवार गटाने आपली हक्काची जळगाव लोकसभा मतदारसंघाची जागा ठाकरे गटाला सोडून रावेर लोकसभा मतदारसंघाची जागा घेतली. मात्र, ही जागा घेतल्यानंतर आता खडसेंनी प्रकृतीचे कारण देत वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेवून निर्णय घेवून अशी भूमिका स्पष्ट केली. त्यातच खडसेंनी काही इच्छुक उमेदवारांच्या नावं देखील जाहीर केली. त्यातली अनेक नावे नवीन असल्याने जुने पदाधिकारी दुखावले असून पक्षात धुसफुस वाढली आहे.

रावेर मतदारसंघातून आमदार एकनाथ खडसे यांच्यासारखा अनुभवी नेता लोकसभा निवडणूक लढविणार असल्याने आघाडीच्या जागावाटपात काँग्रेसने या जागेवरील दावा सोडला होता.मात्र, खडसे निवडणूक लढविणार नसल्याचे संकेत मिळत असल्याने आता काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षांनी या जागेवर दावा केला असून वरिष्ठांकडे तसा प्रस्ताव पाठवला आहे. काँग्रेसकडून आमदार शिरीष चौधरी निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत.

रावेर लोकसभा मतदारसंघातील भाजपाच्या खासदार रक्षा खडसे यांचे तिकीट कापले जाणार असल्याची चर्चा असल्यानेच त्यांचे सासरे एकनाथ खडसे यांनी लोकसभेसाठी दंड थोपटले होते. मात्र, आता पुन्हा रक्षा खडसे यांना पुन्हा संधी देण्याच्या निर्णय भाजपाच्या गोटात झाल्याचे सांगितले जात आहे. यामुळेच एकनाथ खडसे हे बॅकफूटवर गेल्याची चर्चा आहे.

# चांगलं चाललं होतं, आता अचानक कोसळला शेअर बाजार; गुंतवणूकदारांचे १३ लाख कोटी पाण्यात


**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई : गेले काही महिने शेअर बाजारात सुरू असलेल्या तेजीवर मोठा ब्रेक लागला आहे. सोमवार, आठवड्याच्या पहिल्या दिवशी बाजारात पडझड झाली, तर बुधवारी मार्केटने गॅप भरून काढण्याचा सुरुवातीला प्रयत्न केला, पण नफा वसुलीमुळे बाजारात घसरणीचे सत्र सुरू राहिले. बुधवारच्या सत्रात दोन्ही बेंचमार्क निर्देशांकात गुंतवणूकदारांनी विक्रीचा मोठा सपाटा लावला.

**शेअर बाजार कोसळला**

बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचा (बीएसई) सेन्सेक्स एक हजारहून अधिक अंकांनी घसरला आहे तर निफ्टी देखील एक टक्क्यांहून अधिक खाली आपटला. पण स्मॉलकॅप निर्देशांकात ५ टक्क्यांहून अधिक पडझड झाली. डिसेंबर २०२२ नंतर एका दिवसातील स्टॉक मार्केटमधील ही सर्वात मोठी घसरण असून मिडकॅप निर्देशांकही तीन टक्क्यांनी घसरला तर मायक्रोकॅप आणि एसएमई स्टॉक इंडेक्स सुमारे ५ टक्क्यांनी खाली आहे.

शेअर बाजारातील या घसरणीमुळे बीएसई लिस्टेड कंपन्यांचे मार्केट कॅप १२ लाख कोटी रुपयांनी घसरून ३७४ लाख कोटी रुपयांवर आले आहे. दुपारी २.३० वाजता बीएसई सेन्सेक्स १,०४४.९४ अंक किंवा १.४४% घसरून ७२,६२१.२५ अंकांवर ट्रेडिंग करत होता तर एनएसई निफ्टी १.७६ % किंवा ३९४ अंक कमी



होऊन २१,९४१.७० अंकांवर आला.

**या शेअर्सना सर्वाधिक मार**

सेन्सेक्समध्ये सूचिबद्ध शेअर्सपैकी खढउ कंपनीच्या शेअरला बाजारातील या घसरसणीचा अजिबात फटका बसला नाही. आयटीसी शेअर सर्वाधिक सहा टक्क्यांनी वधारला. तर नेस्ले, ढउड, विप्रो आणि एचडीएफसी बँक स्टॉकने उडी घेतली. दुसरीकडे, एनटीपीसी, पॉवर ग्रिड, ओएनजीसी, भारती एअरटेल, टाटा स्टील आणि सन फार्मा या कंपन्यांच्या शेअर्सना बाजारातील घसरणीचा सर्वाधिक फटका बसला.

**बाजारात का झाली मोठी घसरण?**

जिओजित फायनान्शियल सर्व्हिसेसचे व्हीके विजयकुमार म्हणाले की स्मॉलकॅप सेगमेंटमध्ये किरकोळ गुंतवणूकदारांच्या अत्यधिक सक्रियतेमुळे मूल्यांकन खूप जास्त झाले आहे ज्याबाबत गेल्या अनेक महिन्यांपासून चिंता व्यक्त करण्यात येत होती. परिणामी आज देशांतर्गत बाजाराची वाटचाल जागतिक बाजाराच्या उलट्या दिशेला राहिली.

SP५०० निर्देशांकावर रेकॉर्ड उच्चांक गाठला तर FII ने देखील भारतीय शेअर्स खरेदी करण्यास सुरुवात केली आणि या महिन्यात आतापर्यंत ३ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली. अशा परिस्थितीत, केवळ देशांतर्गन्ट पातळीवरील समस्येमुळे गुंतवणूकदारांना तोटा सहन करावा लागत आहे.

**स्टॉक मार्केटच्या घसरणीचे कारण काय?**

आजच्या शेअर बाजारातील घसरणीमागे अनेक कारणे असल्याचं तज्ज्ञांचं मत आहे. गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी गेल्या महिन्यात सेबीने म्युच्युअल फंडांना स्मॉलकॅप आणि मिडकॅपमध्ये एक प्रणाली तयार करण्यास सांगितले होते. तर इक्विटी मार्केट नियामक सेबी अध्यक्षा माधवी पुरी बुच यांनी सोमवारी बाजारात काही संशयास्पद गोष्टी आढळून आल्याची कबुली दिली आणि ही परिस्थिती वाढण्यापासून रोखण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच अनेक ब्रोकरेज आणि आघाडीचे गुंतवणूकदार स्मॉलकॅप शेअर्सच्या मूल्यांकनाबाबत सावधगिरी बाळगून आहेत.

# रोहित शर्मासाठी मी जीवदेखील देईन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नवी दिल्ली : भारताचा अष्टपैलू रवीचंद्रन अश्विनच्या आयुष्यात एक अशी घटना घडली की, त्याचा विचारही आपण करू शकत नाही. पण या कठीण परिस्थितीत कर्णधार रोहित शर्मा एक व्यक्ती म्हणून त्याच्या पाठिशी कसा उभा राहीला आणि त्याने कशी मदत केली, हे अश्विनने आता सांगितले आहे. अश्विनची आई बेशुद्ध झाली होती आणि त्यानंतर रोहित शर्मा नेमकं काय म्हणाला, हे आता अश्विनने सांगितलं आहे.

अश्विन म्हणाला की, मी ५०० विकेट्स पूर्ण केल्या. त्यानंतर सर्वांनी कौतुक केले. पत्रकार परिषदेमध्येही मी जाऊन आलो, पण घरून फोन आला नव्हता. मला वाटलं ते अभिनंदन स्विकारण्यात किंवा मीडियाशी बोलण्यात बिझी असतील. आई-वडिलांशीही माझा संपर्क होत नव्हता. त्यावेळी मी माझ्या पत्नीला फोन केला. तेव्हा प्रीतीचा आवाज हा तुटक, तुटक येत होता. तिने मला सांगितले की, आईचं डोकं दुखत होतं. त्याचं प्रमाण एवढं वाढलं की तिला चक्कर आली आणि ती बेशुद्ध झाली. त्यामुळे आम्ही तुला फोन करू शकलो नाही. तुझा फोनही लागत नव्हता. त्यावेळी मी रोहित शर्मा आणि राहुल द्रविड यांना फोन केला. मी विचार करत असताना रोहित आला आणि म्हणाला की, तु लगेच घरी जाण्यासाठी निघायला हवे. पण सकाळपर्यंत चेन्नईला जाण्यासाठी एकही विमान नव्हते.

अश्विनने पुढे सांगितले की, मी घरी कसा जाईन, याची काळजी रोहितला होती. चेतेश्वर पुजारा जेव्हा ही गोष्ट समजली तेव्हा त्याने मला चेन्नईला जाण्यासाठी चार्टर प्लेनची व्यवस्था केली. रोहितने यावेळी फिजिओ कमलेशला माझ्याबरोबर पाठवले. रोहित फक्त एवढ्यावर थांबला नाही तर तो ठराविक वेळाने कमलेशला फोन करत होता आणि माझ्याबाबत विचारत होता. आतापर्यंत मी रोहितसारखी व्यक्ती पाहिलेली नाही. रोहितने या संपूर्ण कालावधीत माझी काळजी घेतली.

अश्विनने पुढे सांगितले की, आयुष्यात बऱ्याच गोष्टी घडतात. पण अशा गोष्टींच्या वेळी तुम्हाला कोण मदत करतं, त्याला तुम्ही विसरू शकत नाही. ही गोष्ट रोहितबाबत आहे. रोहितला मी कधीही विसरू शकणार नाही. त्यामुळे जर रोहित शर्मासाठी जीव देण्याची वेळ आली तरी मी देईन. कारण त्याने एक व्यक्ती म्हणून माझ्यासाठी जी गोष्ट केली आहे ती मी कधीही विसरू शकणार नाही.

अश्विन अडचणीत असताना रोहित शर्मा हा सावलीसारखा त्याच्याबरोबर होता. ही गोष्ट अश्विनही विसरू शकलेला नाही.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

# सकल मराठा समाजाच्या वतीने सरकारचा निषेध

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मरज : ईश्वरपूर येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सकल मराठा च्य वतीने सरकारचा निषेध केला आपल्या रयतेत शेतकरी आत्महत्या करतोय लोकांच्या उपासमारीची वेळ आलेली आहे तसेच मराठा आरक्षण संदर्भात सुरू असलेला लढा या अनुषंगाने सरकारने एस आय टी ,ई डी हे शस्त्र वापरून जे लोकांच्यावर अन्याय करायचा काम सुरू केलेलं आहे याचा निषेध म्हणून ईश्वरपूर येथे सकल मराठा समाजाच्या वतीने एल्गार व्यक्त करण्यात आला जो नेता पुढारी लाखो



कोट्यवधी व अफाट मालमत्ता गोळा करतो यांच्यावर सरकारने एस ई टी लावावी, व तसेच वीर मराठा यांनी प्राण त्याग केला याची जाणीव सरकारला नसल्याने सरकार मूळ धोरण सोडून हुकूमशाही कडे वाटचाल करत आहे. यावेळी स्वप्नजीत पाटील तानाजी पाटील महेश माने पांडुरंग पाटील कविता कुंभार सतीश कांबळे काका माने लालासाहेब यादव व समस्त मतदार जागृत नागरिक उपस्थित होते.

# जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने यशवंतराव चव्हाणांना अभिवादन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने देशाचे माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण यांना काँग्रेस भवन सांगली येथे अभिवादन करण्यात आले प्रारंभी प्राध्यापक डॉक्टर सिकंदर जमादार यांचे हस्ते यशवंतरावजी चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले व बाकीच्या उपस्थित आणि फुले वाहून आदरांजली वाहिली यावेळी बोलताना प्राध्यापक डॉक्टर सिकंदर जमादार यांनी यशवंतरावजी चव्हाण यांनी महाराष्ट्राबरोबरच देशांमध्ये आपल्या कार्याने वेगळा ठसा उमटविला आहे



त्यांनी पायाभूत सुविधासाठी जिल्हा परिषद पंचायत समिती पर्यंत असलेली सत्ता गावापर्यंत नेऊन लोकशाही बळकट करण्याचे काम केले आहे

त्यांनी सामाजिक शैक्षणिक क्षेत्रामध्ये ही अमुलाग्र बदल घडविले आहे अशा या थोर सांगली जिल्ह्याच्या महाराष्ट्राच्या व देशाच्या सुपुत्राला सांगली जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने विनम्र अभिवादन यावेळी स्वागत व प्रास्ताविक सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष अजित ढोले यांनी केले व आभार विठ्ठलराव काळे यांनी मांडले यावेळी बा ब गोंडा पाटील लालसाब तांबोळी शमशाद नायकोडी जिल्हा सचिव सचिन चव्हाण शिवाजी सावंत विश्वास यादव अपंग सेलचे सुरेश गायकवाड भीमराव चौगुले इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# संख भागातील टंचाईकडे प्रशासन, प्रतिनिधींचे दुर्लक्ष

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

संख : जत तालुक्याच्या पूर्व भागात आणि विशेषतः संख जिल्हा परिषद मतदार संघात सध्या भीषण दुष्काळी परिस्थिती आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी संख येथील लोकसंख्या नुसार पाणी पुरवठा कमी पडत असून सद्या जत पुर्व भागात भिषण दुष्काळ आहे. या दुष्काळाकडे प्रशासन व लोकप्रतिनिधी,ग्रामपंचायत यांनी दुर्लक्ष करीत असल्याची टीका भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष विजय पाटील यांनी केली.

पाटील म्हणाले की, पूर्व भागाकडे नेहमीच लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष करत आहे. टँकरचे साधे निकष बदलता आले नाहीत. टँकर देताना २०११ ची लोकसंख्या गृहीत धरण्यात आली आहे. माणसी २० लीटर पाणी नुसार दिले जाते. तसेच खेपा वेळेवर पडत नाहीत. टँकरचे कालबाह्य निकष बदलण्यासाठी भाजपचे जत विधानसभा निवडणूक प्रमुख तम्मनगौडा रवीपाटील यांनी शासन दरबारी पाठपुरावा सुरू केला आहे. लवकरच त्यात सुधारणा होईल.

टँकर देत असताना जनावरांच्या पाण्याचा विचार करण्यात आला नाही. परिसरात लाखो पाळीव जनावरे आहेत. चारा व पिण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. संख गावास अत्यंत अपुरा पाणीपुरवठा होत आहे. ग्रामपंचायतीकडून नळपाणी व टँकरचे योग्य नियोजन होत नाही. गावात भीषण टंचाई असताना ग्रामपंचायतीचे लक्ष नाही. जादा टँकर दिले जात नाहीत. सद्या ७ वाड्या वस्त्यांवर आठवड्यातून एकदाच पाणी दिले जाते. गावातील मागील २०११ च्या लोकसंख्ये नुसार ३० हजार लिटर पाणीचे टँकर दोन खेप,३० हजार लिटर पाणीचे टँकर दिड खेप,१२ हजार लिटरचे तीन खेप असे एकूण १ लाख ४१ हजार लिटर पाणी पुरवठा होत असून सद्याच्या लोकसंख्या १० हजार हुन अधिक आहे प्रती मानसी २० लिटर पाणी म्हणाले तर अंदाजे २ लाख लिटर पाणी लागतो. व जाणवरासाठी स्वतंत्र पाणी व चारा डेपो चालू करण्यासाठी गावातील लोकप्रतिनिधी प्रयत्न करत नसल्यामुळे तेथील जनतेचे हाल होत आहेत. व प्रशासने टँकरचा कोटा वाढवून द्यावा अशी मागणी विजय पाटील यांनी केली.

# आरपीआय (आठवले) सांगली जिल्हा रोजगार आघाडीची नुतन पदाधिकारी निवड संपन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : सांगली येथील सर्कीट हाऊस येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) सांगली जिल्हा रोजगार आघाडीची आढावा बैठक आयोजित करणेत आली होती. यावेळी बैठकीच्या अध्यक्षस्थानी रिपब्लिकन पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र सचिव तथा मा. नगरसेवक मा. जगन्नाथदादा ठोकळे उपस्थित होते. यावेळी प्रथम सर्व महापुरूषांना अभिवादन करणेत आले. तद्नंतर रिपब्लिकन पक्षाचे रोजगार आघाडीचे सांगली जिल्हाध्यक्ष मा. अरूणभाऊ आठवले यांचे हस्ते पश्चिम महाराष्ट्र सचिव मा. जगन्नाथदादा ठोकळे व रिपब्लिकन पक्षाचे सांगली जिल्हा उपाध्यक्ष मा. मनोज गाडे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करणेत आला.

बैठकीचे प्रास्तविक रोजगार आघाडीचे सांगली जिल्हाध्यक्ष मा. अरूणभाऊ आठवले यांनी केले. यावेळी रोजगार आघाडीचे वतीने वर्षभरामध्ये केलेल्या कार्याचा आढावा घेणेत आला. रोजगार उपलब्धते करिता केंद्रीय मंत्री मा.ना.डॉ. रामदासजी आठवले



साहेब यांच्या मंत्रालयामार्फत उपलब्ध रोजगार योजनेचा बहूजन जनतेला जास्तीत जास्त लाभ कसा मिळवून देता येईल याबाबत सविस्तर चर्चा करणेत आली.

दरम्यान रिपब्लिकन(आठवले) पक्षाच्या नुतन पदाधिकार्यांची निवड करणेत आली. यावेळी रोजगार आघाडीची कार्यकारणी गठीत करणेत आली. यावेळी खालील प्रमाणे निवडी संपन्न झाल्या.

रिपब्लिकन(आठवले) रोजगार आघाडीचे सांगली जिल्हा सरचिटणीस पदी मा. गजानन निशिकांत कांबळे, जत तालुका अध्यक्षपदी मा. तुकाराम विठ्ठल कांबळे, जत तालुका उपाध्यक्षपदी मा. अनिल शिंदे, खानापूर तालुका उपाध्यक्षपदी मा. गणेश पवार, सांगली शहराध्यक्षपदी मा. सिकंदर मुळके, सांगली शहर उपाध्यक्षपदी मा. विशाल साबळे, कुपवाड शहराध्यक्षपदी मा. श्याम सावंत, कुपवाड शहर उपाध्यक्ष पदी मा.उत्कर्ष कांबळे, तासगाव तालुका उपाध्यक्ष पदी मा. दिगंबर कांबळे, सांगली जिल्हा संघटक पदी मा. कुणाल भोरे यांना मा. जगन्नाथदादा ठोकळे, मा. अरूणभाऊ आठवले, मा. मनोज गाडे यांचे हस्ते निवडपत्र देऊन व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करणेत आला व पुढील राजकीय तथा सामाजिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देणेत आल्या. शेवटी नवनिर्वाचीत पदाधिकार्यांचे वतीने रोजगार आघाडीचे सांगली जिल्हाध्यक्ष मा. अरूणभाऊ आठवले यांचा भव्य सत्कार करणेत आला.

यावेळी रिपब्लिकन(आठवले) रोजगार आघाडीचे विटा खानापूर तालुकाध्यक्ष मा.अविनाश बोले, रिपब्लिकन(आठवले) महिला जत तालुका उपाध्यक्ष तथा एकुंडी गावचे सरपंच मा. निकिता कांबळे मॅडम, कुपवाड चे मा. रवींद्र ठोकळे, मा. डॉ सुरेश कांबळे, मा. रमेश कांबळे, मा. सेजल कांबळे, मा. सौरभ जगधने, मा. गजानन गस्ते, मा. संतोष वाघमारे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# गांधीनगर मध्ये भटक्या कुत्र्यांचा उद्रेक

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

गांधीनगर : गांधीनगर मध्ये भटक्या कुत्र्यांचा उद्रेक निर्माण झाल्याने माणसांमध्ये भीतीची वातावरण निर्माण झाले आहे. याकडे गांधीनगर ग्रामपंचायत प्रशासन गंभीर दखल घेण्याच्या मनस्थितीत दिसत नाही असे गांधीनगर मधील नागरिकांच्या वतीने बोलले जात आहे. आत्तापर्यंत गांधीनगर मधील भटक्या कुत्र्यांनी १११ लोकांना जखमी केले आहे. त्यामुळे नागरिक, लहान यांना जीव मुठीत घेऊन रस्त्यावरून जावे लागत आहे. भटक्या कुत्र्यांच्या टोळीकडून अनेकांचा चावा घेतलेला आहे. रेबीज इंजेक्शन उपचार घेऊन सुद्धा काही ना जीव गमावा लागलेला आहे. गांधीनगर मधील माननीय जिल्हाधिकारी जिल्हा परिषद सिओ यांना भटक्या कुत्र्याचा बंदोबस्त करण्याकरता प्रशासनाला निवेदन दिलेलं आहे. यावेळी जीपी ग्रुपच्या गुड्डू सचदेव, निखिल राजपूत, कालू सचदेव, अश्विन वधवा, आमित लल्लानी, विशाल सुंदरानी , नितेश कट्यार , सोनू सुंदरानी, अमित तलरेजा, रोहित सचदेव, यांनी प्रशासनाला निवेदन दिले . या घटनेचे गांभीर्य घेऊन प्रशासनाने याच्याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे असे म्हंटले आहे.

# संजय गुरव यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

## शिक्षक बँकेने केले कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्काराने सन्मानित

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

शिराळा : जिल्हा परिषद शाळा खिरवडे तालुका शिराळा येथील उपक्रमशील शिक्षक संजय तुकाराम गुरव यांना सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेचा कर्मवीर भाऊराव पाटील आदर्श उपक्रमशील शिक्षक पुरस्कार आमदार मानसिंगराव नाईक, आमदार सुमनताई पाटील शिक्षक नेते संभाजीराव थोरात त्यांच्या हस्ते देण्यात आला.



**संजय गुरव यांचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सत्कार करताना आ.मानसिंगराव नाईक, आ.सुमनताई पाटील, संभाजीराव थोरात, विनायकराव शिंदे, गजानन गुरव, मोहनराव गायकवाड.**

सांगली येथील डेक्कन हॉलला झालेल्या कार्यक्रम प्रसंगी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) मोहनराव गायकवाड, शिक्षणाधिकारी (योजना) महेश धोत्रे, शिक्षक बँकेचे अध्यक्ष विनायकराव शिंदे, उपाध्यक्षा सौ.अनिता काटे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी शिक्षक बँकेचे संचालक अशोक घागरे, शिक्षक नेते अनंत सपकाळ, राज्य संपर्कप्रमुख राजकुमार पाटील, पुणे विभागीय अध्यक्ष तानाजी खोत, संचालक राहुल पाटणे, अमोल शिंदे, अमोल माने, वाळवा तालुका शिक्षक संघाचे अध्यक्ष सुधाकर पाटील, शिक्षक नेते संजय काटे, उपक्रमशील शिक्षक दीपक रोकडे, केंद्रप्रमुख आलिशा मुलानी, केंद्र मुख्याध्यापक महादेव पाटील, शिक्षक नेते सी.एम. पाटील, शित्तूरचे माजी सरपंच तानाजी भोसले, एम. सी. पाटील, शंकर करुंगलेकर, जगदीश दिंडे, बाजीराव पाटील, जगन्नाथ शिंदे, तुकाराम गुरव, विजय गुरव, ओंकार गुरव, पोलीस पाटील जयदीप गुरव, चंद्रकांत गायकवाड, सर्जेराव मोहिते, लक्ष्मण नायकवडी, दिलीप चौगुले, स.ना. पाटील, गुलाब मोहिते उपस्थित होते.

# प्रत्येक महिलेने आपल्यातील कौशल्य आणि गुण ओळखून मेहनत घेतली तर यश नक्की

## मिरजेत अँकर अनिता आवटी यांच्या नवदुर्गा इव्हेंट मॅनेजेंट वतीने नवदुर्गाचा सन्मान

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मिरजेत प्रसिद्ध एंकर अनिता आवटी यांच्या नवदुर्गा इव्हेंट मॅनेजमेंटच्या वतीने महिला सन्मान मेळाव्याचे आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाचे प्रायोजक प्रतिभा सिरॅमिक होते. प्रत्येक महिलेच्या मध्ये कौशल्य आणि गुण असतात, आपल्यातील कौशल्य ओळखून मेहनत घेतली तर नक्कीच जीवनात यशस्वी होता येतं, अस मत सौ. प्रज्ञा निरंजन आवटी यांनी व्यक्त केले. मिरजेतील महिला सन्मान मेळाव्यात सौ. प्रज्ञा आवटी ह्या बोलत होत्या.

यावेळी विविध क्षेत्रातील यशस्वी नवदुर्गांचा सन्मान करण्यात आला. यावेळी, सौ.अनिता संदीप



आवटी, डॉ. संदीप आवटी, सौ.सीमा रवींद्र कांबळे, प्रतिभा सिरॅमिकच्या योगिता चौगुले आणि प्रवीणकुमार चौगुले यांच्या सहीत विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. नवदुर्गा इव्हेंट मॅनेजमेंटच्या वतीने विविध क्षेत्रातील नऊ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. कोरोना योद्धा सौ. जयश्री विश्वास बंगेरा, सरोवर मसाल्याचे ओनर मनीषा शहा, मिरज मधील गजानन मंगल कार्यालय, लवा अंकुश हॉल, रघुनंदन लॉनच्या ओनर अनुष्का आठवले, हास्य योगाच्या अँबेसिडर जया जोशी, जेष्ठ साहित्यिका निर्मला लोंढे, अन्नपूर्णा किचनच्या प्रमुख अपर्णा पेंडुरकर, नॅचरोपॅथी तज्ञ डॉ. विमल ठुमके, टू व्हीलर फोर व्हीलर ड्रायव्हिंग प्रशिक्षिका शैलजा शिंदे, इंटरनॅशनल लेप्रसी युनियन डायरेक्टर आणि वैद्यकीय अधिकारी आरती पडसलगीकर यांचा सौ. प्रज्ञा निरंजन आवटी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला.

# चिंचणीत श्री रामलिंग यात्रेतील रथोत्सव व भव्य शोभा यात्रा संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

चिंचणी : महाशिवरात्री निमित्त कडेगांव तालुक्यातील चिंचणी (अं) येथे महाशिवरात्र व रामलिंग यात्रेतील रथोत्सव व भव्य शोभा यात्रा उत्साहात साजरी करण्यात आली.महादेव व श्री रामलिंग मंदिरामध्ये पंचामृत,दुग्धजल अभिषेकासह पुष्प अर्पण व धुपारती, नैवेद्य,भजन,कीर्तन, नाम जप व शिवलीला अमृत पठन करत असा विविध धार्मिक कार्यक्रम करुन भक्तिमय वातावरणात कार्यक्रम संपन्न झाले.

या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. 'हर हर महादेव ,भोलेनाथ,रामनामाचा जयघोष, छत्रपती शिवरायांचा जयघोष' करीत भाविकांनी दर्शनासाठी व शोभा यात्रेला मोठी गर्दी केली. यावेळी विशेषतःभाजपाचे माजी सांगली जिल्हाध्यक्ष मा.आ. पृथ्वीराज देशमुख तसेच कराड येथील हिंदू एकता आंदोलनाचे अध्यक्ष व भाजपा प्रदेश उपाध्यक्ष विक्रम (बाबा) पावसकर यांनी प्रमूख उपस्थिती लावून हिंदू समाजाला प्रेरणा संदेश दिला. या यात्रेत बुधवार कीर्तनसेवा ह.भ.प.सौ.सुप्रियाताई संदिप खंडागळे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले. गुरुवारी बहुचर्चित शिवरायांचा



छावा चित्रपट श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक चिंचणी(अं) येथे संपन्न झाला तसेच शुक्रवारी रामलिंग मंदिर येथे श्री महादेव व श्रीराम अभिषेक, सकाळी ८.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत व शिवलीलामृत पारायण, सायंकाळी वाजता आरती, भजनसेवा करण्यात आले. शनिवारी सकाळ पासून दुपार पर्यंत प्रत्येक घरातून रामलिंग मंदिरामध्ये पुरण पोळ्यांचा नैवेद्य स्विकारुन दुपारी १२ ते ४ पर्यंत महाप्रसाद वाटप करत सांयकाळी ५ ते १० पर्यंत श्री राम रथोत्सव भव्य शोभायात्रा श्री लालगिरी महाराज मठ ते श्री रामलिंग मंदिर असा संपन्न झाला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासमोर महाआरती करण्यात आली. रविवारी पहाटे ५.३० वाजता श्री भवानी मंदिर येथे श्री भवानी मातेस अभिषेक होवून पुढे खारी यात्रा संपन्न झाली. यावेळी संजय गांधी निराधर योजनेचे अध्यक्ष महेंद्र पवार,नेर्लीचे गावचे युवा कार्यकर्ते दत्तात्रेय क्षीरसागर तसेच कडेगांव तालुक्यातून सकल हिंदू कार्यकर्ते आणि सोनहिरा परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कडेगांव तालुक्यातील चिंचणी (अं) येथे साक्षात प्रभू श्री रामांचे पदस्पर्शाने पावन झालेले असे ऐतिहासिक ठिकाण असून अंखड काळापासून अविरत श्री रामलिंग यात्रेची परंपरा असून सध्याच्या काळात ही तरुणांनी तीच परंपरा अविरत चालू ठेवली असून सध्या भव्यदिव्य असा श्रीरामांचा रथ आणि छत्रपती शिवाजी महाराजाचे स्मारक उभारल्याने चिंचणीचे नाव तालुक्यात पुढे येत आहे तसेच प्रभू रामांच्या व शिवरायांच्या प्रेरणेने समाजाला नवी दिशा बहाल होत आहे. गावाचे नाव लौकिक करण्यासाठी आपल्या गावातील तरुण मुलांकडून सहकार्य करण्यासाठी खारीचा वाटा मला मिळाला याचा मला अभिमान असून मला तरुण मुलांचे कौतुक करावयाचे वाटते. यासाठी सकल समाजाने एकत्र येत हिंदू संस्कृतीचे जतन करावे असा संदेश दिला.

# रामदास आठवलेंना सन्मानाने शिर्डी मतदार संघ सोडावा

## राजेंद्र खरात : देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी : अन्यथा भाजप विरोधात काम करण्याचा इशारा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांना शिर्डी मतदार संघातून उमेदवारी देऊन त्यांना लोकमतातून निवडून आणावे अशी मागणी रिपब्लिकन पक्षाचे सांगली जिल्हाध्यक्ष राजेंद्र खरात यांनी निवेदनाद्वारे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना केली असून आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडे याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे.



आमदार गोपीचंद पडळकर यांना निवेदन देताना रिपब्लिकन पक्षाचे सांगली जिल्हाध्यक्ष राजेंद्र खरात व उपस्थित मान्यवर

राजेंद्र खरात पुढे म्हणाले, गेली दहा वर्ष रिपब्लिकन पक्ष हा आपल्या महायुतीचा घटक पक्ष म्हणून काम करत आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारत देशात महायुतीला रिपब्लिकन पक्षाचा पाठिंबा आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची देश विकासाची व लोकशाही बळकटी करून संविधान मजबूत करण्याची भूमिका अनुसूचित जमाती मध्ये रुजविण्याचे काम रामदास आठवले करीत असून ते आज देशातील संपूर्ण दलित समाजाचे आशास्थान आहेत. मागील १० वर्षामध्ये सातत्याने भारतीय जनता पार्टी व महायुतीच्या उमेदवारांना निवडून आणण्यामध्ये रामदास आठवले यांचा मोठा वाटा आहे.

त्यामुळे राज्यासह देशातील दलित समाजाच्या लोक भावनांचा आदर करून आगामी येऊ घातलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील शिर्डी या राखीव मतदारसंघातून रामदास आठवले यांना उमेदवारी द्यावी ही तमाम भीम सैनिकांची भावना आहे.

जर रामदास आठवले यांना भाजपने उमदेवारी नाही दिली तर, महाराष्ट्र नव्हे तर संपूर्ण भारत देशात भीम सैनिकांमध्ये असंतोष निर्माण होईल याचा परिणाम संपूर्ण भारत देशात महायुतीला होऊ शकतो. त्यामुळे देशातील भीम सैनिकांच्या मतदार बांधवांचा आदर करून शिर्डी या लोकसभा मतदारसंघातून रामदास आठवले यांना उमेदवारी मिळावी अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली असून आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडे सदरचे निवेदन देण्यात आले आहे.

यावेळी लक्ष्मण मोटे, सुनील तोरणे, बाळासाहेब गवंड, भारत वाघमारे, नामदेव खरात, सुभाष मदने, बशीर मुजावर, महादेव पाटोळे, शरद घाडगे, गणेश लोखंडे, रणजित ऐवळे, विवेक सावंत, सुरेश जावीर,मारुती ढोबळे, नितीन तोरणे, आदी उपस्थित होते.

# चांदोलीतील पाणीसाठ्यात चार महिन्यात १३ टीएमसीने घट

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

शिराळा : चांदोली (ता. शिराळा) धरण पाणलोट क्षेत्रातून पाण्याची आवक पूर्णपणे बंद झाल्याने ३ ऑक्टोबर रोजी धरणाचे चारही वक्राकार दरवाजे बंद करण्यात आले होते. यानंतर धरणातून वीजनिर्मिती केंद्र तसेच कालव्यातून मागणीनुसार पाणी सोडण्यात येत होते. परिणामी गेल्या पाच महिन्यात धरणातील पाणीसाठा १३ टीएमसीने घटला आहे. गतवर्षीपेक्षा यंदाचा पाणीसाठा ३ टीएमसीने कमी आहे.

सध्या केवळ वीजनिर्मिती केंद्रातून १५८५ क्यूसेकने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामध्ये कालव्यांमध्ये ३५० क्यूसेक तर वारणा नदीत १२३५ क्यूसेकने विसर्ग सुरू आहे. सध्या धरणात केवळ १४.५८ टीएमसी (५२.९७ टक्के) उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.

पावसाळ्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात धरण पाणलोट क्षेत्रात पावसाने दमदार हजेरी दिली होती. यामुळे १ ऑक्टोबर रोजी चारही वक्राकार दरवाजे उघडले होते. पावसाने उघडीप दिल्यानंतर ३ ऑक्टोबरला हे दरवाजे बंद करण्यात आले. यानंतर केवळ वीजनिर्मिती केंद्रातून विसर्ग सुरू होता. गेल्या पाच महिन्यात १३ टीएमसी पाणीसाठा कमी झाला आहे. यावर्षी या धरण परिसरात आजअखेर १८८९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

चांदोली धरणाची पाणी साठवण क्षमता ३३.४० टीएमसी असून सध्या पाणीसाठा २१.४६ टीएमसी (६२.३८ टक्के) तसेच उपयुक्त साठा १४.५८ टीएमसी (५२.९७) आहे. गेल्या पाच महिन्यात १३ टीएमसी पाणीसाठा कमी झाला आहे. गतवर्षी हा साठा २१.४३ टीएमसी होता. म्हणजे यावर्षी २.९५ टीएमसी कमी आहे.

मोरणा धरणातून शेतकऱ्यांना पाणी द्यावे तसेच औद्योगिक वसाहतीला पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्यात कपात करावी अशी मागणी होत आहे.

मोरणा धरणात सध्या ३२ टक्के तर कार्वे व रेठरे धरण तलावात २० टक्के पाणीसाठा आहे. तालुक्यातील पाच पाझर तलाव कोरडे पडले आहेत. इतर तलावातील पाणीसाठाही झपाट्याने कमी होत आहे. वाकुर्डे योजनेचे पाणी सोडल्याने करमजाई धरण व हत्तेगाव, रेड, बेलदारवाडी, इंग्रुळ तलाव ९० टक्के भरले आहेत. ३३० कूपनलिकांच्या पाणी पातळीत घट झाली आहे.

एकूण क्षमता ३४.४० टीएमसी
धरण पाणीसाठा : २१.४६ टीएमसी (६२.३८ टक्के)
उपयुक्त पाणीसाठा : १४.५८ टीएमसी (५२.९७ टक्के)
एकूण पाऊस : १८८९ मिलिमीटर

वीजनिर्मिती केंद्रातून : १५८५ क्यूसेक, कालव्यामध्ये : ३५० क्यूसेक, नदीपात्रात : १२३५ क्यूसेक

# वसंत मोरेंना समाजमाध्यमांवरील प्रसिद्धी ठरली घातक

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे: हातात हातोडा किंवा भला मोठा सोटा, लाईव्ह येतोय, तयार रहा, अशी पोस्ट, मग मध्येच कधी तरी माझ्यामुळे ताईला घर मिळाले ची रिल, कधी हा माझा सख्खा मित्र म्हणून कोणाच्या तरी गळ्यात गळा... अशा सगळ्या पोस्टला लाखाच्या पुढच्या लाईक्स अन हजारोच्या कमेंटस.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वसंत मोरे यांची स्टाईल अशी होती. तात्या म्हणून ओळख असलेले हे नगरसेवक मनसेच्या स्थापनेपासूनचे मनसैनिक. पक्षाध्यक्ष राज ठाकरे यांचा पुण्यातील उजवा हात. पण समाजमाध्यमांवरील प्रसिद्धी वाढतच चालली, त्याचबरोबर पोस्टही, त्याला मिळणारे लाईकही..तेवढे बास होते. राज नाराज झाले, त्यांनी एकदा भर मिटिंगमध्ये कार्यकर्त्यांना समाजमाध्यमांचा जपून वापर करा म्हणून जाहीरपणे झापले. हे वसंतरावांनाच होते अशी माहिती लगोलग सगळीकडे पसरली. ती पसरवली गेली असा मोरे यांचा आरोप आहे. तोही त्यांनी समाजमाध्यमांवरून जाहीरपणेच केले. मग त्यांनी शहराध्यक्षपद सोडले तर त्यांना राज यांनी काढले अशा बातम्या आल्या.

मध्यंतरी एकदा एका सभेला ते आजारी नाहीत म्हणून आले नाहीत असे सांगितले गेले, तर सर्वांच्या आधी गाडी घेऊन हे हजर झाले व मी ठणठणीत आहे, हितशत्रूंनीच ही अफवा पसरवली असा आरोपही केला. हे हितशत्रू म्हणून मनसेचेच स्थानिक नेते असे त्यांचे म्हणणे. माझी प्रसिद्धी त्यांना खुपते यासाठी ते राज यांचे कान भरतात असा मोरे यांचा युक्तीवाद. एकदा दस्तुरखुद्द राज यांनीच बोलावून घेतले. बहुधा सगळेच नीट सांगितले. त्यानंतर काही दिवस मोरेंचे वारे शांत होते.

लोकसभा निवडणुकीची चर्चा सुरू झाली अन या वाऱ्यात जोर आला. त्यांच्या परिसरात भावी खासदार म्हणून फलक लागले. तसेच शहरातील रिक्षांवरही ते फिरू लागले. एकमेव तात्या, बाकी सगळ्यांच्या नुसत्याच बाता असे काहीतरी समर्थक बोलू लागले. मोरे ज्या स्थानिक नेत्यांवर टीका करत होते, ते शांत होते, पण आतून कदाचित काम करत असतील, नसतील. ते त्यांनाच माहिती, पण मोरे यांच्या समर्थकांना डावलण्यात येऊ लागले. लोकसभा निवडणुक मनसेने लढवू नये, पुणे शहर लोकसभा तर मुळीच लढू नये, उगीचच पक्षाचे नाव जाईल असे अहवाल स्थानिकांकडून वरिष्ठांकडे जाऊ लागले. हाही मोरेंचाच आरोप.

मग याच आरोपाचा आधार घेत त्यांनी मंगळवारी मनसेला अखेरचा रामराम ठोकला. तोही त्यांच्या खास स्टाईलने. समाजमाध्यमांवर सगळीकडे दिसेल असाच. कार्यालयातील राज यांच्या प्रतिमेला त्यांनी सांष्टांग नमस्कार घातला.

# भाजपाकडून महाराष्ट्रातील २० उमेदवारांची घोषणा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

राज्य आणि देशातील राजकीय वर्तुळाचं लक्ष लागून राहिलेली भाजपाची उमेदवारांची दुसरी यादी आज प्रसिद्ध झाली आहे. महायुतीचं जागावाटप अडल्याने रखडलेली महाराष्ट्रातील उमेदवारांची यादीही भाजपानं प्रसिद्ध केली आहे. यामध्ये एकूण २० उमेदवारांची धोषणा भाजपाकडून करण्यात आली आहे.

भाजपाकडून महाराष्ट्रातील २० उमेदवारांची घोषणा, दिग्गजांसह अनेक धक्कादायक नावांचा समावेश



राज्य आणि देशातील राजकीय वर्तुळाचं लक्ष लागून राहिलेली लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाची उमेदवारांची दुसरी यादी आज प्रसिद्ध झाली आहे. भाजपाकडून देशभरातील एकूण ७२ उमेदवारांची नावं आज प्रसिद्ध करण्यात आली आहेत. त्यात महाराष्ट्रातील २० उमेदवारांचा समावेश आहे. भाजपाने काही विद्यमान खासदारांची तिकीटं कापली आहेत. तर राज्यातील काही बड्या चेहऱ्यांना लोकसभेसाठी उमेदवारी दिली आहे. बीडमधून पंकजा मुंडे, चंद्रपूरमधून सुधीर मुनगंटीवार, मुंबई उत्तर येथून पियूष गोयल, जळगावमधून स्मिता वाघ आणि पुण्यातून मुरलीधर मोहोळ ही भाजपाच्या यादीमधील लोकसभेला उमेदवारी देण्यात आलेली प्रमुख नावं आहे.

आज प्रसिद्ध केलेल्या २० उमेदवारांच्या यादीमध्ये भाजपानं नागरपूरमधून नितीन गडकरी यांना उमेदवारी दिली आहे. तर जालना येथून पक्षाने रावसाहेब दानवे यांना पुन्हा संधी दिली आहे. सांगलीमधून संजयकाका पाटील आणि अहमदनगरमधून सुजय विखे यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. त्याबरोबरच वर्धा येथून रामदास तडस, नांदेडमधून प्रतापराव चिखलीकर, नंदूरबारमधून हीना गावित, धुळे येथून सुभाष भामरे, रावेर येथून रक्षा खडसे, भिवंडीतून कपिल पाटील, दिंडोरी येथून भारती पवार, लातूरमधून सुधारक शृंगारे आणि माढा येथून रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांना पुन्हा एकदा उमेदवारी देण्यात आली आहे.

मात्र काही मतदारसंघामध्ये भाजपानं उमेदवार बदलले आहेत. राज्यातील आघाडीच्या महिला नेत्या पंकजा मुंडे यांना प्रीतम मुंडे यांच्या ऐवजी बीडमधून उमेदवारी दिली आहे. चंद्रपूरमधून ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांना उमेदवारी दिली आहे. त्याशिवाय मुंबई उत्तरमधून विद्यमान खासदार गोपाळ शेट्टी यांच्या जागी केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांना आणि मुंबई उत्तर पूर्वमधून मनोज कोटक यांच्या जागी मिहीर कोटेचा यांना उमेदवारी दिली आहे. जळगावमध्येही भाजपानं उमेदवार बदलला असून, तेथे उन्मेष पाटील यांच्या जागी स्मिता वाघ यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर अकोला येथून भाजपाकडून संजय धोत्रे यांच्या जागी अनूप धोत्रे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

राज्यातील महायुतीचं जागावाटप अद्याप जाहीर झालेलं नाही. मात्र तरीही भाजपानं आपल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली आहे. मात्र या यादीचं वैशिष्ट्य म्हणजे जे मतदारसंघ महायुतीमध्ये भाजपाच्या वाट्याला आले आहेत. तसेच २०१९ मध्ये भाजपानं जिथून निवडणूक लढवली होती. अशाच मतदारसंघातील उमेदवारांची घोषणा आज भाजपाकडून करण्यात आली आहे.

# सांगलीतील ७०० कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांचे बेमुदत कामबंद आंदोलन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : महावितरणमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घेण्याच्या मागणीसाठी मागील आठवड्यात आंदोलन केले. मात्र, सरकारने दुर्लक्ष केल्याने जिल्ह्यातील ७०० कंत्राटी कर्मचाऱ्यांनी बुधवारपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या संपामुळे जिल्ह्यातील वीज यंत्रणा सलाईनवर असून, ५० टक्के काम ठप्प झाले. तसेच शासनाने आंदोलनावर तोडगा न काढल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. दरम्यान, विश्रामबाग येथील महावितरण कार्यालयासमोर कर्मचाऱ्यांनी बुधवारी निदर्शने केली.



कंत्राटी कर्मचाऱ्यांना शाश्वत रोजगार आणि नवीन भरती न करता कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याची प्रमुख मागणी आंदोलकांची आहे. महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संघर्ष कृती समितीने गेल्या काही दिवसांपासून आंदोलन पुकारले होते. या आंदोलनाकडे राज्य सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे महावितरणच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी बेमुदत कामबंद आंदोलन केले आहे. या बेमुदत कामबंद आंदोलनामध्ये जिल्ह्यातील सातशेहून अधिक कंत्राटी कर्मचारी सहभागी झाले आहेत.

कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनामुळे महावितरणचे कामकाज ५० टक्क्यांहून अधिक ठप्प झाले आहे. महावितरणच्या वीज मंडळाच्या कंत्राटी कामगार संघटनेतर्फे प्रलंबित १६ प्रकारच्या मागण्यांबाबत यापूर्वी पाच टप्प्यांत आंदोलन केले होते. या पाच टप्प्यांतील आंदोलनांमध्ये राज्य सरकारकडून कोणतीच भूमिका घेतली गेली नाही. त्यामुळे राज्यभरात महावितरणचे कंत्राटी कर्मचारी संपावर गेले आहेत.

सांगलीतील विश्रामबाग येथील महावितरणच्या कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर वर्कर्स फेडरेशनचे सरचिटणीस कॉ. महेश जोतराव, दत्तात्रय पाटील, कंत्राटी कामगार महासंघाचे गणेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने केली. यावेळी कर्मचाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करून परिसर दणाणून सोडला होता. राज्य सरकारने संपाबाबत तातडीने तोडगा काढला नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

# मविआचा हातकणंगलेमध्ये उमेदवार ठरला

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : आगामी लोकसभा निवडणुकीत कोल्हापूर हातकणंगले मतदारसंघातून महाविकास आघाडीकडून लढण्यास राजू शेट्टी यांनी नकार देत एकला चलो रे चा नारा कायम ठेवल्याने आता महाविकास आघाडीच्या गोटात उमेदवार देण्याच्या हालचाली वाढल्या असून आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष व्ही.बी पाटील यांच्या निवासस्थानी महाविकास आघाडीतील नेत्यांची बैठक पार पडली आहे. या बैठकीत हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून माजी आमदार सत्यजित (आबा) पाटील सरूडकर यांचं नाव एकमताने पुढे करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे हातकणंगले लोकसभा मतदारसंघात आता तिरंगी लढत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कोल्हापूर व हातकणंगले लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडी आणि महायुतीकडून उमेदवार कोण याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे. हातकणंगले लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीने माजी खासदार राजू शेट्टी यांनी आपल्या सोबत येऊन निवडणूक लढवावी अशी इच्छा व्यक्त केली होती. या संदर्भात काँग्रेस व शिवसेनेकडून राजू शेट्टी यांच्यासोबत चर्चा देखील सुरू होती. मात्र राजू शेट्टी यांनी एकला चलो रे चा नारा कायम ठेवत महाविकास आघाडीने मला बाहेरून पाठिंबा द्यावा अशी भूमिका शेवटपर्यंत ठेवल्याने आता महाविकास आघाडीकडून येथे उमेदवार देण्याच्या चाचपणी सुरू झाली असून येथे तिरंगी लढत होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

राजू शेट्टी यांनी महाविकास आघाडी मधून लढण्यास नकार दिल्यानंतर गेल्या काही दिवसांपूर्वी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर मतदार संघातील प्रमुख नेत्यांची बैठक घेत माजी आमदार सुजित मिणचेकर आणि माजी आमदार सत्यजीत (आबा) पाटील सरूडकर यांना तयारी करण्यासाठी सांगण्यात आले होते.

# पुरूषी मानसिकतेत बदल झाल्यास महिलांचा विकास होईल : डॉ. सुप्रिया साळुंखे-कदम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी : पुरुषी, कर्मठ, सनातनी, धर्मांध मानसिकतेत ज्यावेळी सर्वकष बदल होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने महिलांचा आदर सन्मान, शारीरीक व मानसिक विकास होईल. असे मत डॉ. सुप्रिया साळुंखे-कदम यांनी व्यक्त केले.श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय आटपाडीच्या बीसीए आणि कला विभागाच्या वतीने आयोजित जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमात डॉ. सुप्रिया साळुंखे-कदम बोलत होत्या.

मुलींचे शारीरीक व मानसिक आरोग्य या विषयावर बोलताना त्या म्हणाल्या, मुलगा-मुलगी भेदातून मुलींना मिळणारी सापत्न भावाची वागणूक, हुंड्यासाठी केला जाणारा छळ, वैधव्यात वाट्याला येणारे जीवघेणे वातावरण, अपत्यप्राप्ती न होण्यासाठी स्त्रीयांनाच जबाबदार धरणे, मासीक पाळीवरून अपवित्र, अशुद्ध म्हणून धार्मिक स्थळी होणारा प्रतिबंध, काळी, नकटी, बुटकी वगैरेवरून दिले जाणारे टोमणे, कोणत्याही कारणावरून आईवरून शिवी देणे, या पुरुषी मानसिकतेत बदलाची नितांत गरज आहे. पुरुषांच्या बरोबरीने काबाडकष्ट करणारी, प्रसुतीच्या जीवघेण्या वेदना सहन करणारी, शेतीचा शोध लावणारी, घरांची निर्मिती करणारी नव्हे तर घराचा गाडा अन्याय, अत्याचार सहन करत प्रचंड मेहनतीने सहीसलामत ओढणारी स्त्री हीच खरी योध्दा आहे.

पुरुषांप्रमाणेच शारीरीक मानसिक आणि बौध्दीक दृष्ट्या सक्षम असणाऱ्या कष्टकरी स्त्रीयांना निम्म्या रोजगारावर राबविले जाते हे दुर्देवी आहे. स्त्रीला सर्वच ठिकाणी समान संधी मिळाली पाहिजे.



महिला दिनानिमित्त विविध स्पर्धातील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण करताना प्रा. डॉ. शिवाजीराव भोसले, डॉ. सुप्रिया साळुंखे-कदम व उपस्थित मान्यवर

समानतेतूनच मोजले पाहीजे. अंधश्रध्देत भरडल्या जाणाऱ्या महिला, त्या करीत असलेले उपास-तापास-व्रतवैकल्ये, त्यांना जेवणात कमी प्रमाणात मिळणारी जीवनसत्वे, प्रोटीन, फायबर, मिनरल्स यामुळे रक्तातील हिमोग्लोबीनचे कमी प्रमाण, घरातले भांडण, तंटे, ताण, तणाव यांचा सर्वात मोठा त्रास महिलानांच होतो, यावर योग्य उपाययोजना हीच त्यांच्या उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली ठरेल. असे शेवटी डॉ.सुप्रिया साळूंखे-कदम यांनी स्पष्ट केले.

बीसीए व कला विभागाच्या विद्यार्थिनी गुलशन मुल्ला, प्रिया जगताप, आकांक्षा लिंगे, कोमल देशमुख यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. सुजाता देशमुख मॅडम यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंद यांचे उपस्थितीत प्राचार्य व प्रमुख पाहुणे यांचे हस्ते श्रीमंत बाबासाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करणेत आले.

'मन मै है विश्वास' ह्या विषयावर साधना चव्हाण यांनी, अनेक प्रेरणात्मक चित्रफिती दाखवून उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मुलींनी आत्मविश्वास आणि धाडसाने पुढे जाण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले. योग्य आहार विहार व्यायाम ह्या त्रिसूत्री ने मानसिक आरोग्य कसे संतुलित राखता येईल हे समजवण्यात आले. महिला दिनाचे औचित्य साधून सर्व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. तसेच महाविद्यालयस्तरीय आयोजित केल्या गेलेल्या विविध स्पर्धा मध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

प्रा. डॉ. शिवाजीराव भोसले यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना स्त्री शक्तीला नमन केले. विद्यार्थिनीसाठी उत्तमोत्तम सेवा देण्यास महाविद्यालयात तत्पर राहील असे सांगितले. शुभांगी पिसे, प्रिती चव्हाण, कोमल देशमुख यांची यावेळी भाषणे झाली.

यावेळी प्रा.अनिल पाटील, प्रा.विजय शिंदे, प्रा.गणेश सुतार, प्रा.प्रवीण लांडगे, प्रा.डॉ.ऋतुजा कुलकर्णी, प्रा.डॉ.सुजाता देशमुख, प्रा.डॉ.मंगल मारकड, प्रा.अनुराधा जाधव, प्रा.अनिता साळुंखे, प्रा.मनीषा पुसावळे, प्रा.सुविधा देशमुख, प्रा. जयमाला देशमुख इत्यादी अनेक मान्यवर उपस्थित होते. आकांक्षा लिंगे यांनी आभार मानले.